‘‘कंधार व लोहा तालुक्यातील साक्षरता व व्यवसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्याशाखे अंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी. पदवीसाठी

सादर करावयाच्या शोध-प्रबंधाची रूपरेखा

सारांश

:: संशोधक ::

श्री. शेटे सिद्धेश्वर बाबुराव

सह शिक्षक, भीमाशंकर माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय,

शिराढोण, ता. कंधार, जि. नांदेड

:: मार्गदर्शक ::

डॉ. आर. बी. कोटलवार

संशोधन मार्गदर्शक व भूगोल विभाग प्रमुख,

राजीव गांधी महाविद्यालय,

मुदखेड, जि. नांदेड

:: संशोधन केंद्र ::

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जुलै, २०२३

''कंधार व लोहा तालुक्यातील साक्षरता व व्यवसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास''

प्रस्तावना:

'भूगोल' हा प्राचीन विषय आहे. अगदी प्रारंभिक अवस्थेत 'भूगोल' म्हणजे पृथ्वीचे वर्णन करणारे शास्त्र अशी व्याख्या केली गेली होती. पृथ्वीवर ज्या ज्या गोष्टी मानवाला आढळल्या त्या सर्वाचे निरीक्षण करून मानवाने त्यांच्या नोंदी केल्या व तेथूनच भूगोलाची सुरूवात झाली. 'लोकसंख्या भूगोल' ही मानवी भूगोलाचीच नव्याने उदयास आलेली एक उपशाखा आहे. लोकसंख्या किंवा मानवी समुह हा पृथ्वीच्या पृष्ठभागावरील सर्वात महत्वाचा घटक आहे. मानवाकडे असलेली बौद्धिक क्षमता, कल्पकता, दुरदृष्टी, श्रम करण्याची प्रवृत्ती, शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान इ. गुणांमुळे तो विविध साधनांचीनिर्मिती करतो व आपले जीवन सुखी व समृद्ध करण्याचा प्रयत्न करतो म्हणून मानवास एक प्रमुख भौगोलिक अभिकर्ता संबोधले जाते[१].

इ. स. १९५३ मध्ये जी. टी. त्रिवार्था यांनी अमेरिकन भूगोल तज्ञांच्या परिषदेमध्ये लोकसंख्या भूगोलास मानवी भूगोलाची एक स्वतंत्र शाखा म्हणून मान्यतादेण्यासंबंधी भूगोल तज्ञांना अवाहन केले. लोकसंख्या भूगोलासभूगोलाची एक महत्वपूर्ण शाखा म्हणून विकसित करण्याचे कार्य सर्वप्रथम जी. टी. त्रिवार्थानी केलेले असल्यामुळे त्यांना 'लोकसंख्या भूगोलाचे जनक' या नावाने संबोधले जाते[२].

लोकसंख्या भूगोलात प्रामुख्याने पृथ्वीवरील लोकसंख्या या घटकाचा अभ्यास केला जातो. लोकसंख्येच्या वितरणावर विविध घटक परिणाम करतात. त्यामध्ये जन्मदर, मृत्युदर व साक्षरता या घटकाचा समावेश होतो. साक्षरता हे सांस्कृतिक विकासाचे एकमेव पूर्वाभिमुख साधन असून्तो सामाजिक व आर्थिक विकासावर प्रभावकारी ठरणारा महत्वपूर्ण घटक आहे. त्यामुळे वर्तणूक, नैतिकता आणि सामाजिक जाणीव वृद्धींगत होते. साक्षरतेमुळे आंतरराष्ट्रीय संबंध हे मैत्रीपूर्ण व शांततामय राहतात. साक्षरता एखाद्या प्रदेशाच्या विकासाचे प्रतिबिंब असते. कारण साक्षरतेमुळे परस्परातील सामाजिक संबंध वृद्धिंगत होतात. त्यामुळे आर्थिक, सामाजिक व राहणीमानाचा दर्जा वाढतो. तसेच दरिद्रता घटवण्याचे उत्तम साधन आहे. साक्षरतेमुळे आंतरराष्ट्रीय संबंध हे मैत्रीपूर्णव शांततामय राहतात. तसेच एखाद्या समाजात किंवा प्रदेशात साक्षरतेचे प्रमाण जास्त असेल तर जन्मदर कमी आढळून येतो. साक्षरतेमुळे अंधसृद्धा व गरीबी दूर होण्याची शक्यता जास्त असते. विश्वबंधुत्वाची भावना वाढीस लागण्यास मदत

होते. मानवाद्वारे केल्या जाणाऱ्या आर्थिक क्रियेस ‘व्यवसाय’ असे म्हणतात. व्यावसायिक रचना ही श्रमजीवी लोकांच्या दृष्टिने अतिशय महत्वाची असते. व्यावसायिक रचनेच्या अभ्यासामुळे व्यापार, धंदा व इतर आर्थिक कामात किती व्यक्ती गुंतल्या आहेत याबद्दल माहिती मिळते. लोकसंख्या भूगोलात व्यावसायिक रचनेचा अभ्यास हा महत्वपूर्ण आहे. व्यवसायाचे सर्वसाधारणपणे पाच प्रकारात वर्गीकरण केले जाते. यामध्ये प्राथमिक व्यवसाय, द्वितीयक व्यवसाय, तृतीयक व्यवसाय, चतुर्थक व्यवसाय आणि पंचम व्यवसायाचा समावेश होतो.

कंधार व लोहा तालुक्यातील साक्षरता व व्यावसायिक रचनेचा अभ्यास करताना इ.स. २००१ ते २०२१ यादरम्यानचा जवळपास २० वर्षांचा कालावधी घेण्यात आला आहे.

लोकसंख्या भूगोलाचा अर्थ व व्याप्ती:

विसाव्या शतकामध्ये मानवी भूगोलामधील ज्ञानात मोठ्या प्रमाणात वाढ होत गेल्याने त्यातुनच लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची शाखा विकसीत झाली. या शाखेत लोकसंख्येच्या प्रादेशिक विश्लेषणावर जास्त भर दिलेला असतो. लोकसंख्या किंवा मानवी समूह हा पृथ्वीच्या पृष्ठभागावरील सर्वात महत्वाचा घटक आहे. मानव हा बुद्धीमान प्राणी म्हणुन ओळखला जातो. मानवाकडे असलेली बौद्धीक क्षमता, कल्पकता, दुरदृष्टी, श्रम करण्याची प्रवृत्ती, शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान इ. गुणामुळे तो विविध साधनांची निर्मिती करतो व आपले जीवन सुखी व समृद्ध करण्याचा प्रयत्न करतो म्हणून मानवास एक प्रमुख भौगोलिक अभिकर्ता म्हणून संबोधले जाते.

लोकसंख्या भूगोलाचा विकास घडवून आणण्यामध्ये जे.आय. क्लार्क, बिजु गार्नियर, झेलेन्स्की, मेलेझीन व डी.आय. बैलेन्टी यांनी महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. लोकसंख्या भूगोल म्हणजे लोकसंख्येच्या प्रादेशिक विश्लेषणाचा अभ्यास असून यामध्ये लोकसंख्येच्या विविध अंगावर त्या प्रदेशातील भौगोलिक पार्श्वभुमीने केलेला परिणाम व त्या प्रदेशातील लोकांनी सभोवतालच्या भौगोलिक परिस्थितीशी केलेले समायोजन यांचा अंतर्भाव होत असतो.

लोकसंख्या भूगोल ही भूगोलाची नव्याने उदयाला आलेली शाखा आहे.यामध्ये लोकसंख्येच्या विविध अंगाचा स्थल व कालपरत्वे अभ्यास केला जातो. लोकसंख्या भूगोलाच्या व्याप्ती विषयी म्हणजेच अभ्यास क्षेत्राविषयी भूगोल तज्ञामध्ये मतभिन्नता आढळते. त्यामुळे वेगवेगळ्या तज्ञांनी व्याप्तीविषयी मते मांडलेली आहेत.

लोकसंख्येची भौतिक, सामाजिक व आर्थिक वैशिष्टये, भौतिक वैशिष्टयामध्ये लिंग, बुध्दी, आर्युमान, वंश इ. घटकांचा समावेश तर सामाजिक घटकामध्ये विवाह, कुटुंबपध्दत, घर, साक्षरता, शिक्षण, भाषा, धर्म, राष्ट्रीयता ई. घटकांचा समावेश व आर्थिक वैशिष्ट्यामध्ये उदयोग, व्यवसाय, उत्पन्न इत्यादी घटकांचा समावेश केलेला आहे.

लोकसंख्येचे वितरण, वस्त्यांच्या आकार आणि त्यामधील अंतरखंडीय आणि उपखंडीय लोकसंख्येच्या वितरणाची प्रारुपे, प्रदेशा-प्रदेशातील लोकसंख्येचे वितरण व कालसापेक्ष लोकसंख्येचे वितरण इ. लोकसंख्येची घनता, घनतेचे विविध प्रकार, घनतेवर परिणाम करणारे घटक, घनतेचे जागतिक व प्रादेशिक प्रारूप, लोकसंख्येचे स्थलांतर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्थलांतर, स्थलांतरावर परिणाम करणारे घटक, प्रकार, कारणे, परिणाम आणि नियम इ. तसेच लोकसंख्येची वाढ, लोकसंख्या वाढीचे मापन, जन्मदर, मृत्यूदर लोकसंख्या वाढीचे घटक, नियंत्रक घटक, कारण, सिद्धांत ई याशिवाय लोकसंख्येची रचना, वंश, धर्म, भाषा, लिंग, व्यवसाय, वैवाहिक स्थिती, शिक्षण, आर्थिक स्तर, परावलंबी लोकसंख्या, कार्यकारी लोकसंख्या, नोकरीविषयक स्थिती, उत्पन्न आणि खर्च इ. साक्षरता आणि लोकसंख्येची गुणवत्ता, साक्षरतेचे स्तर, साक्षरता नियंत्रित करणारे घटक, जागतिक प्रारुपे, ग्रामीण व नागरी लोकसंख्या, ग्रामीण लोकसंख्येमधील फरक, नागरीकरणाची प्रक्रिया, नागरीकरण प्रक्रियेवर परिणाम करणारे घटक इ. लोकसंख्या साधनसंपत्ती गुणोत्तर, लोकसंख्या साधनसंपत्ती विकास, लोकसंख्या वाढीचा साधनसंपत्तीवर होणारा परिणाम, साधनपसंपत्तीवर अधारित लोकसंख्याविषयक सिध्दांत पर्याप्त लोकसंख्या, रिक्त लोकसंख्या व अतिरीक्त लोकसंख्या इत्यादी, जागतिक लोकसंख्येचा भौगोलिक दृष्टीकोनातुन विचार, जागतिक लोकसंख्या वाढ, वाढीचा कल व वाढीचा अंदाज, जागतिक स्थलांतर, लोकसंख्येचे वितरण, गुणोत्तर, सरासरी आयुर्मान इ. आणि आधुनिक काळात नगररचनाकाराना सुनियोजित नगराच्या निर्मितीसाठी वस्ती व पर्यावरण यांचा पुनश्चः विचार करावा लागणार आहे.

अभ्यास क्षेत्राची निवड:

संशोधन आभ्यासाकरिता मानवी भूगोल या ज्ञान शाखेतील साक्षरता व व्यवसायिक रचना या संदर्भातील अभ्यासक्षेत्र हे निवडले आहे. नांदेड जिल्हयातील कंधार व लोहा तालुक्यातील साक्षरता व व्यवसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास यांचा तुलनात्मक अभ्यास या संशोधन विषयावर हे संशोधन कार्य करणार आहे. सदरील विषयाचा अभ्यास करताना दोन्ही तालुक्यातील साक्षरता व व्यवसायिक रचना

यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. सदरील संशोधन कार्य महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील आठ जिल्हापैकी नांदेड जिल्हातील कंधार व लोहा तालुका अंतर्गत असून नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण - पूर्वसीमेला दक्षिणोत्तर पसरलेला आहे. हा संशोधन विषय मागील काळामध्ये कोणीही संशोधित केला नाही व माझे कार्यक्षेत्र कंधार तालुक्यात असल्याकारणाने मला माहिती मिळवत असताना कसलीही अडचण होणार नाही यामुळे सदर संशोधन कार्य क्षेत्राची निवड मी केली आहे.

शिक्षणावरून लोकसंख्येचे वर्गीकरण करता येते. लोकसंख्येच्या विविध पैलूंपैकी शिक्षण हा एक महत्त्वाचा पैलू आहे. शिक्षणामुळे माणसाची स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचीबुद्धी विकसित होते. तसेच उत्कृष्ट आणि निकृष्ट ओळखण्याची क्षमता प्राप्त होते. शिक्षणाच्या अभावाने समाजाचा विकास खोळंबतो. समाजाचा विकास हा वर्तमान काळामध्ये किती खर्च करतात ह्यावर अवलंबून असतो. तसेच औपचारिक शिक्षणावर किती वर्ष खर्च होतात ह्यावर व्यक्तीचा शैक्षणिक दर्जा अवलंबून असतो. अविकसित देशात शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण फार कमी असते. दुय्यम आणि तृतीय (माध्यमिक व उच्च शिक्षणाकरिता लागणारा खर्च, उत्पादन क्षमता असलेल्या उद्योगांपासुन मिळविता येतो. अविकसित देशांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण हे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या प्रमाणापेक्षा कमी असते. अशा देशांमध्ये एकूण विद्यार्थ्यांच्या तुलनेत केवळ ३४ विद्यार्थी उच्चशिक्षण घेतात. तर उच्चशिक्षणातील शिक्षकांचे प्रमाण एकूण शिक्षकांमध्ये ८% आढळते.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रकारे अपत्य असते. तर दुसऱ्या अर्थाने समाज परिवर्तनाचा निर्माता होय. यामुळे शिक्षण हे सामाजिक बदल आणि संस्कृती संक्रमणाचे प्रभावी साधन होय (Brookover, 1955). आधुनिकीकरणाचा एक विशेष म्हणजे सार्वत्रिक शिक्षण व शिक्षणाच्या सुविधा वाढविणे, शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानाचा अधिक उपयोग झाल्याने आधुनिकीकरणाला वेग येतो. शिक्षण सुधारते, उच्च दर्जाचे उत्पादन होते, परिणामी जीवनमान व राहणीमानाचा दर्जा उंचावतो. आधुनिकीकरण ही एक निरंतर प्रक्रिया आहे व ती दीर्घकालिन असते. आधुनिकीकरण ही एक गतिमान संकल्पना (Dynamic Concept) आहे. तिच्यामधे सामाजिक बदलाचा व आधुनिक काळाशी मिळते जुळते घेण्याचा अर्थ अभिप्रेत आहे. आधुनिकीकरण म्हणजे शास्त्रीय व तांत्रिक युगात पदार्पण हे सुलभ होण्यासाठी शिक्षण व शैक्षणिक सुविधात वाढ व्हावयास हवी. म्हणून सदरील विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्याच्या उत्तरेस यवतमाळ जिल्हा, दक्षिणेस परभणी जिल्हा, पश्चिमेस लातूर जिल्हा आहे. जिल्ह्याच्या दक्षिण - पूर्व बाजूला तेलंगणा राज्याची सीमा आहे. तर दक्षिणेस कर्नाटक राज्याची सीमा आहे. नांदेड जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०,५२८ चौ. कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या ३.४१ टक्के आहे . प्रशासकीय सोईसाठी नांदेड जिल्ह्याचे १६ तालुके निर्माण केले असून त्यापैकी कंधार व लोहा या दोन तालुक्याची निवड सदरील संशोधन कार्यासाठी करण्यात आलेली आहे.

कंधार तालुक्याचा अक्षवत्तीय विस्तार १८° ५४' उत्तर ते १८° ५७' उत्तर अक्षवत्त आहे तर रेखावृत्तीय विस्तार ७७° ११' पूर्व ते ७७° १९' पूर्व रेखावृत्त दरम्यान आहे. २०११ च्या जनगणनेनुसार कंधार महसूल अंतर्गत १२७ महसूल गावाचा समावेश आहे. कंधार तालुक्याची एकूण लोकसंख्या ६,३४,०३१ इतकी आहे . यात पुरुषाचे प्रमाण ५३ टक्के तर स्त्रियाचे प्रमाण ४७ टक्के आहे. तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ सुमारे ८४४.१८ चौ.कि.मी. इतके आहे. कंधार तालुक्याच्या पूर्वेस देगलूर तालुका, उत्तरेस नांदेड जिल्हा, दक्षिणेस लोहा तालुक्याच्या सीमा आहेत. प्रशासकीय सोईसाठी या तालुक्याचे पाच मंडळ करण्यात आले आहेत. त्यात कंधार, उस्माननगर, बारुळ, पेठवडज व कुरुळा यांचा समावेश होतो.

नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८° ५७' उत्तर ते १८° ९६' उत्तर अक्षवृत्त असून रेखावृत्तीय विस्तार ७७° ७' पूर्व ते ७७° १३' पूर्व रेखावृत्त या दरम्यान आहे. या तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ ८३५.५२ चौ.कि.मी. इतके असून २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या २,४१,८८५ इतकी आहे. यात पुरुषाचे प्रमाण ५२ टक्के तर स्त्रियांचे प्रमाण ४८ टक्के आहे. लोहा तालुक्याच्या पूर्वेस मुदखेड व नायगाव तालुका , पश्चिमेस पालम तालुका, उत्तरेस नांदेड तालुका तर दक्षिणेस मुखेड तालुक्याच्या सीमा आहेत. प्रशासकीय सोईसाठी या तालुक्याचे चार मंडळ पाडण्यात आली आहेत. त्यात सोनखेड, कापसी, लोहा व माळाकोळी यांचा समावेश होतो.

अभ्यास क्षेत्राची व्याप्ती व मर्यादा :

कोणतेही संशोधन कार्य करत असताना विषयाची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट कराव्या लागतात सदर संशोधन कार्याची मर्यादा नांदेड जिल्हातील कंधार व लोहा तालुक्यापर्यंत मर्यादित असून या दोन्ही तालुक्यातील गावाचा समावेश यात आहे. या मर्यादीत क्षेत्रातील साक्षरता व व्यवसायिक रचना संबधित घटकाचे अध्ययन करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन कार्यात व्यवसायाचे वर्गीकरण तीन भागात

करण्यात आलेले आहे. जनगणना अहवाल १९९१ मध्ये व्यावसायिक रचना ९ गटात विभागली आहे. तीच रचना २००१ च्या जनगणना अहवालात ५ गटात विभागली आहे. तर २०११ मधील जनगणना अहवालात फक्त लोकसंख्या संदर्भात आकडेवारी दिली आहे. आणखी ही परिपूर्ण अहवाल प्रकाशित झाला नाही. त्यामुळे व्यावसायिक रचना संदर्भात सर्व माहिती जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन यातील तृतीयक, चतुर्थक व पंचम आशा व्यवसायाची माहिती मिळवली जाणार आहे. दोन तालुक्याच्या अभ्यास क्षेत्राचा विस्तार लक्षात घेता दुय्यम श्रेणीवर अधिक भर देण्यात येणार आहे.

साक्षरता व व्यावसायिक रचना संदर्भात द्वितीयक माहिती स्त्रोतांचा वापर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, जनगणना अहवाल, विविध संशोधन पत्रिका, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट व शेवटी प्रत्यक्ष मुलाखती घेऊन माहिती गोळा केली जाणार आहे. प्राथमिक माहिती मिळवत असताना सर्व माहिती बरोबरच मिळेल असे नाही त्यामुळे संशोधन कार्यावर मर्यादा पडतात.

गृहीतके:

१. साक्षरतेवर व व्यावसायिक रचनेवर विविध घटकांचा परिणाम होतो.

२. साक्षरतेत व व्यवसायिक रचनेत समानता आढळून येत नाही.

३. साक्षरतेत व व्यवसायिक रचनेत स्थल व कालसापेक्ष परिवर्तन होते.

संशोधनाची उद्दिष्टये:

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधकाने खालील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

१. कंधार व लोहा तालुक्यातील भौगोलिक घटकांचा अभ्यास करणे.

२. कंधार व लोहा तालुक्यातील साक्षरतेचे व व्यावसायिक रचनेचे महत्व जाणून घेणे.

३. कंधार व लोहा तालुक्यातील साक्षरतेवर व व्यवसायिकरचनेवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

४. अभ्यास क्षेत्रातील साक्षरतेचे व व्यावसायिक रचनेचे तुलनात्मक स्वरूप अभ्यासणे.

५. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण व नागरी साक्षरतेचे व व्यावसायिक रचनेचे बदलते स्वरूप अभ्यासणे.

६. अभ्यास क्षेत्रातील साक्षरता व व्यवसायिक रचना यातील सहसंबध अभ्यासणे.

संशोधन पदधती:

सदरील संशोधन कार्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरुपाची माहिती वापरण्यात येणार असून प्राथमिक स्वरूपाच्या माहितीसाठी तालुक्यातील नमुना निवड पद्धतीने सर्वेक्षण करून प्रत्यक्ष मुलाखत तंत्राचा अवलंब करण्यात येणार आहे.संशोधन कार्य करताना प्रत्यक्ष गावाना भेटी देऊन निवडक माहिती संकलित करण्यात येणार आहे. दुय्यम स्वरुपाच्या माहितीसाठी जिल्हा जनगणना अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, विविध संशोधन पत्रिका व अहवाल यांचा आधार घेण्यात येणार आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी मिळवण्यात येणाऱ्या प्राथमिक व द्वितीयक माहितीचे विश्लेषण विविध सारणी, नकाशे व आलेखाच्या सहाय्याने करण्यात येणार आहे. त्याकरिता सांख्यिकीय पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. त्याकरिता अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येची साक्षरता दर्शविण्यासाठी खालील सुत्राचा वापर करण्यात येणार आहे.

$$\text{साक्षरता} = \frac{\text{एकूण साक्षर लोकांची संख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times \text{१००}$$

वरील सुत्राच्या आधारे एकुण लोकसंख्येपैकी किती टक्के लोक साक्षर आहेत हे दर्शविले जाते. कंधार व लोहा तालुक्यातील व्यावसायिक रचनेचा अभ्यास करताना प्राथमिक आर्थिक व्यवसाय, द्वितीयक आर्थिक व्यवसाय व तृतीयक आर्थिक व्यवसायाचे मंडळनिहाय वर्गीकरण करण्यात येणार आहे. तसेच लोकसंख्या व साक्षरता काढण्यासाठी स्पिअरमन रँक सहसंबंध पद्धतीने काढला जाणार आहे. यासाठी खालील सुत्राचा वापर करण्यात येणार आहे.

$$r = 1 - \left(\frac{6\Sigma d^2}{n^3 - n}\right)$$

Whereas,

r = Stands for correlation co - efficient.

d = Stands for differences between ranks.

d^2 = Stands for square of rank differences.

n = Stands for number of items.

साहित्याचे पुनरावलोकन:

लोकसंख्येची वैशिष्ट्ये, संरचना तसेच साक्षरता याविषयी मोठ्या प्रमाणात संशोधन झाले आहे. अनेक संशोधन पेपर, शोधनिबंध, विविध प्रतिमान, वेगवेगळे प्रक्षेपण तयार झाले आहेत. कारण लोकसंख्या हा घटक गतिमान आहे. या गतिमान घटकात होणारा बदल अभ्यासणे तज्ञांना अत्यंत महत्वाचे वाटते. त्यातील काही महत्वपुर्ण संशोधन कार्य पुढीलप्रमाणे आहेत.

रमोत्रा आणि कृष्णचंद्र (२०००):

'लिट्रेसी अँड एज्युकेशनल अटाइनमेंट इन राळेगणसिद्धी अँड अॅप्रीसिएल' यामध्ये त्यांनी जलसिंचन सुविधावर भर दिला. त्याचबरोबर प्रस्तुत अभ्यास क्षेत्रातजातनिहाय साक्षर-निरक्षर, लिंगनिहाय साक्षर-निरक्षर यांचे प्रमाण मांडण्याचा प्रयत्नकेला. त्यामुळे त्या भागातील आर्थिक विकास भरभराटीला आला असे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

खान झेड. टी. (२००१):

'सोसिओ इकॉनॉमिक अॅक्युपेशनल स्ट्रक्चर अँड न्युटेशनल लेवल इन मुस्लीम स्लम डेव्हलपर्स इन रायपुर सिटी' यामध्ये त्यांनी झोपडपट्टीतील सामाजिक व आर्थिक स्थितीचा उल्लेख केला तसेच आहाराचा व इतर अडचणीचाही उल्लेख केला. त्या अडचणी दूर करण्यासाठी विकासाचा नवीन आराखडाही रायपुर प्रशासनाला सांगितला यासाठी त्यांनी रायपुर शहरामध्ये संतोषीनगर झोपडपट्टीतील सर्वेक्षण केले आहे.

प्रशांती (२००३): यांनी भारतातील दशलक्ष शहरातील लोकसंख्येच्या सामाजिक आणि आर्थिक वैशिष्ट्यांचा अभ्यास केला. प्रस्तुत शोधनिबंधात संशाधकाने भारतातील दशलक्ष शहरातील लोकसंख्या विषयक घटकांचा सहसंबंध काढलेला आहे.

यादव जे. टी. (२००४): यांनी भारतातील लोकसंख्येची संरचना, लोकसंख्या वाढ, लोकसंख्या घनता, साक्षरता इ. घटकावर संशोधन केलेले आहे.

हसन एम. आय. (२००५): यांनी भारतातील लोकसंख्येचे विविध घटक व त्यावर प्रभाव करणारे भौगोलिक घटक यावर सखोल संशोधन केलेले आहे.

प्रा. दास. एम. एम. (२००६): यांनी ईशान्य भारतातील लोकसंख्या वाढ व अन्नधान्य उत्पादन या दोन घटकाचा सखोल अभ्यास केलेला आहे.

डॉ. चंदना आर.सी. (२००७): यांनी लोकसंख्येची वैशिष्ट्ये घटक, संकल्पना आणि पद्धती यांचा अभ्यास केला आहे.

डॉ. अष्टुरे एस.बी. (२००९): यांनी औरंगाबाद जिल्हयातील लोकसंख्येचीवैशिष्ट्ये व अन्नधान्य संसाधन या दोन घटकांच्या सहसंबंधाचा अभ्यास केलेला आहे.

गायकवाड यु.टी. (२००९): यांनी नांदेड जिल्हयातील अनुसुचित जाती व जमाती या दोन घटकातील लोकसंख्याविषयक विविध घटकावर संशोधन केलेले आहे.

डॉ.यु.बी.सोनुले (२०१०): यांनी लोकसंख्येची घनता, लोकसंख्या वितरण, वाढ, लिंग रचना व वयरचना, साक्षरता, लोकसंख्या प्रक्षेपण इ. घटकावर संशोधन केलेले आहे.

वीर बहादूर सिंग (२०११):यांनी सामाजिक व आर्थिक स्तर व ग्रामीण व नागरी भागातील अनुसूचित जातीतील इयत्ता दुसरीतील मुलांचा बदल यावरती आपले कार्य केले आहे.

शेलार एस. के. (२०१२): यांनी आपल्या संशोधन प्रबंधात लोकसंख्या व त्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास केला आहे. यात लोकसंख्या वाढ, बदल, स्थलांतर अशा लोकसंख्या शास्त्रीय घटकांवर त्या प्रदेशाचा कसा परिणाम झाला आहे हे सांगितले आहे.

सुनीलकुमार सुरपूर (२०१५):यांनी कर्नाटक राज्यातील अनुसूचित जातींना मिळालेल्या आरक्षणामुळे सामाजिक, आर्थिक व शैशणिक बदलांचा अभ्यास केला आहे.

डॉ. माया सरोदे (२०१८): यांनी आपली संशोधनात लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील लोकसंख्या संरचेचा अभ्यास केला आहे. या प्रदेशातील लोकसंख्या वैशिष्टे व लोकसंख्या वितरण यावर प्रकाश टाकला आहे.

डॉ. पी. डी. राठोड (२०१८): यांनी त्यांच्या संशोधन प्रबंधात आंध्र प्रदेश, कर्नाटक व नांदेड जिल्ह्यातील सीमेवरील लोकसंख्या वैशिष्टे यांचा अभ्यास केला आहे.

नियोजित प्रकरणांची रुपरेषा :

'कंधार व लोहा तालुक्यातील साक्षरता व व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास' हा अभ्यास विषय एकूण सहा प्रकरणातून अभ्यासण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले: प्रस्तावना/ प्रास्ताविक

प्रकरण पहिले प्रस्तावना असून त्यामध्ये प्रस्तावना, लोकसंख्या भूगोलाचा अर्थ व व्याप्ती, अभ्यासक्षेत्राची निवड, संशोधनाच्या मर्यादा, गृहीतके, उद्दिष्ट्ये, माहितीस्त्रोत व संशोधन पद्धती, साहित्याचे पुनरावलोकन व प्रकरणांची रूपरेषा इत्यादी घटकांचे वर्णन करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : अभ्यासक्षेत्राची भौगोलिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी

प्रकरण दुसरे अभ्यास क्षेत्राची भौगोलिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी असून यामध्ये भौगोलिक व सांस्कृतिक घटकांची चर्चा करण्यात आलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रस्तावना, अभ्यासक्षेत्राचे स्थान व विस्तार, अभ्यासक्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्राकृतिक रचना, नदीप्रणाली, हवामान, नैसर्गिक वनस्पती, मृदा, खनिजे, भूकंपक्षेत्र, अभ्यासक्षेत्राची सांस्कृतिक पार्श्वभूमी लोकसंख्या, भूमी उपयोजन, जलसिंचन, वाहतूक व संदेशवहन, कृषीसाधने, पशुधन, औद्योगिकीकरण, सार्वजनिक आरोग्य इत्यादी घटकांचे वर्णन करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : कंधार व लोहा तालुक्यातील साक्षरता (२००१-२०२१)

प्रकरण तिसरे कंधार व लोहा तालुक्यातील साक्षरता असून यामध्ये प्रस्तावना, साक्षरतेच्या व्याख्या, साक्षरतेवर परिणाम करणारे घटक, साक्षरतेचे महत्व, कंधार व लोहा तालुक्यातील एकुण साक्षरता, पुरुष व स्त्री साक्षरता, अनुसूचित जातीतील साक्षरता, अनुसूचित जातीतील पुरुष व स्त्रीसाक्षरता, अनुसूचित जमातीतील साक्षरता, अनुसूचित जमातीतील पुरूष व स्त्री साक्षरता, अनुसूचित जाती व जमातीतील स्त्रियांच्या शिक्षणासाठी सोयी-सवलती इत्यादी घटकांचे वर्णन केले जाणार आहे.

प्रकरण चौथे : कंधार व लोहा तालुक्यातील व्यावसायिक रचना (२००१-२०२१)

प्रकरण चौथे कंधार व लोहा तालुक्यातील व्यावसायिक रचना असून यामध्ये प्रस्तावना, व्यावसायिक रचनेवर परिणाम करणारे घटक, कंधार व लोहा तालुक्यातील एकुण कामगाराचे प्रमाण, ग्रामीण व नागरी कामगाराचे प्रमाण, कंधार व लोहा तालुक्यातील ग्रामीण-नागरी व्यावसायिक रचना, पुरूष व स्त्री व्यावसायिक रचना, अनुसूचित जातीतील व्यावसायिक रचना, अनुसूचित जातीतील पुरूष व स्त्री व्यावसायिक रचना, अनुसूचित जमातीतील व्यावसायिक रचना, अनुसूचित जमातीतील पुरूष व स्त्री व्यावसायिक रचना, अनुसूचित जाती व जमातीतील व्यवसायासाठीच्या सोयी-सवलती इत्यादी घटकांचे वर्णन करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : क्षेत्र अभ्यास

प्रकरण पाचवे क्षेत्र अभ्यास असून यामध्ये प्रस्तावना, निवडक गावातील गावनिहाय साक्षरता, गावनिहाय एकुण व्यावसायिक रचना, गावनिहाय पुरुष व्यावसायिक रचना, गावनिहाय स्त्री व्यावसायिक रचना इत्यादी घटकांचे वर्णन करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : निष्कर्ष, समस्या व उपाययोजना

प्रकरण सहावे निष्कर्ष, समस्या व उपाययोजना असून यामध्ये प्रस्तावना, निष्कर्ष, समस्या व उपाययोजना इत्यादी घटकांचे वर्णन करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ:

१. प्रा. दाते, सौ. दाते (२००२) : प्राकृतिक भू-विज्ञान, अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, २००२, पृष्ठ क्र. ११-१२.

२. माजिद हुसेन व रमेश सिंह (२००९) : भौगोलिक मॉडल्स, टाटा मॅग्रॉहिल्स, सेरिज, २००२ पृ. क्र. १.

३. डॉ. शेटे, डॉ. फुले, डॉ. शहापुरकर (१९९८): लोकसंख्या भुगोल विद्याभारतीप्रकाशन, लातुर, १९९८, पृ. क्र. ८-९.

४. त्रिवार्था जी. टी. (१९६९): A Geography of Population : word patterns john wily and sons, New York.

५. ए. मेलेझीन (१९६३) : "Trends and issues in the soviet Geography of Population. ॲनल्स ऑफ असोसिएशन ऑफ अमेरिकन जिओग्राफर्स, जर्नल.

६. जे. आय. क्लार्क (१९६५): Population Geography pregame Press, oxford.

७. मॅडम बीजू गार्नियन (१९६६) : Geography of population Longmans, London.

८. डॉ.शेटे, डॉ. फुले, डॉ. शहापुरकर (१९९८): लोकसंख्या भुगोल विद्याभारतीप्रकाशन, लातुर, १९९८, पु. क्र. १३-१५.

९. त्रिवार्थी जी. टी. (१९६९) : A Geography of Population word Patters john wily and sons, New York.

१०. जना एम. एस. (१९९६): Population planning in Sikkim Annuls vol. XVI No. १, Pp ७२-७६.

११. कनकूरे, के.बी., पस्तापूरे भागवत आणि धनुश्वर रमेश (२०११): “नांदेड जिल्हयातील ग्रामीण वस्ती स्थळांच्या नावाच्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास", Universal Research Analysis, Vol. I, Issue II, March-August 2011, PP. 159-163.

१२. गाथे मनोज (२०१२): “अमरावती जिल्हयातील लोकसंख्या वितरणाचे भौगोलिक विश्लेषण”, शोध, समीक्षा और मूल्यांकन, Vol. IV, Issue 42, July 2012, PP. 418-419.

१३. जिल्हा जनगणना अहवाल, नांदेड २००१ व २०११.

१४. जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन २००१ ते २०२१.

१५. जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन, नांदेड व लातूर (२०१५-२०२१).

१६. नांदेड जिल्हाः माहिती पुस्तिका, कृषी संचलानालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, २०११.

दि. / ०८ / २०२३

स्थळ: **नांदेड**

संशोधक विद्यार्थी
श्री. सिद्धेश्वर शेटे

संशोधन मार्गदर्शक
डॉ. आर. बी. कोटलवार